दि. 27/02/2026

**प्रेसनोट**

**पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची परिक्षेत्रात अवैध व्यवसायिकांविरुध्द मोहिम**

**अहमदपुरात मोठा वाळू साठा जप्त, तर किनगांव, कळमनुरीत मटक्याविरुध्द कारवाया**

**दोन कोटी रुपयांची साधनसामुग्री, वाळू व रोख रक्कम जप्त**

नांदेड जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी व अंमलदारांचे पथक अहमदपुर येथे पाठविले होते.

सदर पथकास, दिनांक 26/02/2026 रोजी सायंकाळी 21.45 वा. दरम्यान पोलीस ठाणे अहमदपुर हद्दीत अहमदपुर ते नांदेड जाणारे रोडचे बाजूला रुई शेत शिवारामध्ये मोठया प्रमाणावर अवैधरित्या वाळू साठवणूक केल्याचे आढळून आले. सदर ठिकाणी साठवणूक केलेली वाळू ही नांदेड येथून हायवाव्दारे आणली जात होती व नंतर ती विविध वाहनांतून गरजेप्रमाणे अहमदपूरसह लातूर जिल्हयातील इतर ठिकाणी पाठविण्यात येत होती.

पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता, त्यांना काही लोक JCB मशीन व इतर वाहनांसह उपरोक्तप्रमाणे कामकाजात मग्न असल्याचे आढळून आले. पथकाने या ठिकाणाहून 06 Tata कंपनीचे हायवा, एक JCB मशीन यासह, साठवून ठेवलेली (220) ब्रास वाळू, असा एकूण 2 कोटी 21 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमूद प्रकरणात पोलीस ठाणे अहमदपुर येथे गुरनं 91/2026 कलम 303(2), 3(5), भारतीय न्याय संहिता सह कलम 15 पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 अन्वये (07) आरोपीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस ठाणे अहमदपुर येथील पोउपनि रवि बुरकुले हे करीत आहेत.

मागील दोन दिवसांत, पथकाने लातूर जिल्हयातील किनगांव, नांदेड जिल्हयातील पोलीस ठाणे मुदखेड व उमरी, हिंगोली जिल्हयातील कळमनूरी, त्याचप्रमाणे परभणी जिल्हयातील गंगाखेड पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध रेतीसह मटका - जुगाराच्या आणखी (5) कारवाया केल्या असून, सर्व कारवायांमध्ये मिळून एकूण रुपये 2,42,46,060/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

| अ.क्र. | जिल्हा | पो.स्टे. | गुरनं कलम | कार्यवाही | जप्त मुद्देमाल | आरोपी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नांदेड | उमरी | 33/2026 कलम 12 (अ) म.जु.का. | मटका | नगदी रुपये 8670 रुपये/- व (03) मोबाईल असा एकूण 29,670/- रुपये | 04 |
| 2 | नांदेड | मुदखेड | 31/2026 कलम 303,3(5) बीएनएस | वाळू | 02 Tata कंपनीचे टिपर, 01 हायवा व (10) ब्रास वाळू, एकूण 19 लाख रुपये | 03 |
| 3 | हिंगोली | कळमनूरी | 76/2026 कलम 12 (अ) म.जु.का. | मटका | नगदी रुपये 26,170 रुपये (03) मोबाईल एकूण 42,170/- रुपये | 03 |
| 4 | लातूर | किनगांव | 43/2026 कलम 12 (अ) म.जु.का. | मटका | नगदी रक्कम 8110/- व 06 मोबाईल असा एकूण 44,110/- रुपये | 07 |
| 5 | परभणी | गंगाखेड | गुरनं 125/2026 कलम 12 (अ) म.जु.का. | जुगार | नगदी रुपये 64,610/- व 06 मोबाईल फोन असा एकूण 1,30,110/- रुपये | 19 |

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या **nandedrange.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर किंवा 91 50 100 100 **या 'खबर'** हेल्पलाइनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड